असा. क्र. ३८ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, ऑगस्ट ८, २००५/श्रावण १७, शके १९२७**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

**पृष्ठे**

**सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.**—राज्य अल्पसंख्याक आयोग घटित करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. . . . . . . . . ४२९-४३६

दिनांक ५ ऑगस्ट २००५ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ८ ऑगस्ट २००५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**राज्य अल्पसंख्याक आयोग घटित करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र विधानसभेत दिनांक ३० नोव्हेंबर, २००० रोजी मांडलेले महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग विधेयक, २००० (सन २००० चे विधानसभा विधेयक क्रमांक ७८) हे दिनांक ३० एप्रिल, २००२ रोजी राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात आले होते आणि ते संयुक्त समितीकडे प्रलंबित होते ;



[**किंमत** : रुपये ९.००]

**आणि ज्याअर्थी,** अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधी, अल्पसंख्याक आयोगाला, दीर्घकाळ प्रलंबित असलेला सांविधिक दर्जा तातडीने द्यावा, यासाठी राज्य शासनाकडे सतत विनंती करीत होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी राज्य अल्पसंख्याक आयोग घटित करण्याकरिता कायदा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून त्यांनी दिनांक २४ ऑगस्ट २००४ रोजी महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अध्यादेश, २००४ प्रख्यापित केला होता ; २००४ चा महा. अध्या. २९.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे विवक्षित फेरबदलांसह राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## **प्रारंभिक**

संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २४ ऑगस्ट, २००४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

व्याख्या. **२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "आयोग" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ३ अन्वये घटित करण्यात आलेला महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग, असा आहे ;

(ख) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचा सदस्य, असा आहे ;

(घ) "अल्पसंख्याक" याचा अर्थ, महाराष्ट्र राज्यात राहणारा आणि शासनाने ज्याला अल्पसंख्याक म्हणून **राजपत्रातील** आदेशाद्वारे वेळोवेळी घोषित केले आहे असा लोकसमूह, असा आहे ;

(ङ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(च) "सचिव" याचा अर्थ, आयोगाचा सचिव, असा आहे.

## प्रकरण दोन

## **राज्य अल्पसंख्याक आयोग**

आयोग घटित करणे. **३.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, शासन, मुंबई येथे मुख्यालय असलेले, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग म्हणून संबोधले जाणारे एक मंडळ या अधिनियमान्वये आयोगाला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करण्यासाठी आणि त्याच्याकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्यासाठी, घटित करील.

(२) हा आयोग, पुढील व्यक्तींचा मिळून बनलेला असेल,—

(क) प्रतिष्ठित, सक्षम व प्रामाणिक व्यक्तींमधून शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक अध्यक्ष, उपाध्यक्ष व नऊ इतर सदस्य :

परंतु, अध्यक्ष व उपाध्यक्षासह सर्व सदस्य हे अल्पसंख्याकांमधील असतील ; आणि

(ख) शासनाने नियुक्त केलेला आयोगाचा सचिव हा शासनाच्या उप सचिवापेक्षा कमी दर्जाचा नसेल.

अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी व सेवेच्या शर्ती.

४. (१) शासनाच्या मर्जीला अधीन राहून, आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व प्रत्येक सदस्य हा, त्याने अधिकारपद ग्रहण केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(२) आयोगाच्या अध्यक्षास, उपाध्यक्षास किंवा सदस्यास आपल्या सहीनिशी, शासनाला संबोधून लिहिलेल्या पत्राद्वारे आपल्या पदाचा राजीनामा देता येईल, परंतु, त्याचा राजीनामा स्वीकृत करण्यात येईपर्यंत तो पद धारण करणे चालू ठेवील.

(३) अध्यक्षाला, उपाध्यक्षाला किंवा इतर सदस्यांना, विहित करण्यात येतील असे वेतन व भत्ते मिळतील.

(४) अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते, कलम ११ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून भागवण्यात येतील.

(५) सदस्याचे नैमित्तिक रिक्त पद शासनाकडून शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल आणि अशाप्रकारे नामनिर्देशित केलेला सदस्य हा, ज्याच्या जागी त्याचे नामनिर्देशन झाले असेल अशा सदस्याने जोपर्यंत ते पद धारण केले असते तोपर्यंत ते पद धारण करील.

(६) अध्यक्षाच्या अनुपस्थितीत, उपाध्यक्ष हा, अधिनियम आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यांखालील अध्यक्षाची कार्ये पार पाडील.

अनर्हता.

५. (१) कोणतीही व्यक्ती जर—

(क) ती, शासनाच्या मते ज्यामध्ये नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव आहे अशा अपराधाबद्दल दोषी ठरविलेली असेल आणि तिला कारावासाची शिक्षा झाली असेल ; किंवा

(ख) ती विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने ती तशी असल्याचे घोषित केले असेल ; किंवा

(ग) ती अमुक्त नादार असेल ; किंवा

(घ) तिला केंद्र सरकारच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या सेवेतून किंवा केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांचे नियंत्रण असलेल्या संस्थेच्या किंवा महामंडळाच्या सेवेतून काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल ; किंवा

(ङ) तिने काम करण्यास नकार दिला असेल किंवा ती काम करण्यास असमर्थ झाली असेल ; किंवा

(च) आयोगाकडून अनुपस्थितीची परवानगी न घेता आयोगाच्या लागोपाठच्या तीन बैठकींना ती अनुपस्थित राहिली असेल ; किंवा

(छ) तिने अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा सदस्य पदाचा अशा प्रकारे गैरवापर केला असेल की, ज्यामुळे तिचे पदावर राहणे अल्पसंख्याकाच्या हिताच्या किंवा लोकहिताच्या दृष्टीने हानीकारक ठरेल असे शासनाचे मत असेल,

तर तिला अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा यथास्थिति, सदस्य म्हणून, नियुक्त केले जाण्यासाठी आणि त्या पदावर राहण्यासाठी अनर्ह ठरविण्यात येईल :

परंतु कोणत्याही व्यक्तीला, त्याबाबतचे आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय या खंडान्वये तिला पदावरून दूर करण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये अनर्ह ठरविण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस शासनाकडून पदावरून दूर करण्यात येईल.

आयोगाचा सचिव.

६. (१) सचिवाला, शासन वेळोवेळी निर्धारित करील असे वेतन व इतर भत्ते मिळतील.

(२) शासनास, सचिवाला, वेळोवेळी, अनुपस्थितीची परवानगी देता येईल.

(३) सचिव हा आयोगाचा मुख्य कार्यकारी असेल आणि तो,—

(क) आयोगाच्या अनुदानाचा उपयोग करील ;

(ख) आयोगाचे लेखे ठेवण्याची व्यवस्था करील ; आणि

(ग) हा अधिनियम किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यांद्वारे किंवा त्यांअन्वये त्याच्यावर सोपविण्यात आली असतील अशी इतर कार्ये पार पाडील.

आयोगाचा कर्मचारीवर्ग.

७. (१) शासन, आयोगाचे कामकाज योग्य रीतीने होण्यासाठी आवश्यक असेल असा कर्मचारी वर्ग आयोगाला पुरवील.

(२) आयोगाचा सचिव व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांना देय असलेले वेतन, भत्ते आणि निवृत्तीवेतन यांसह आयोगाचा प्रशासनिक खर्च, कलम ११ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

आयोगाच्या बैठकी.

८. (१) आयोगाची बैठक आवश्यक असेल त्या त्यावेळी मुंबईत किंवा अध्यक्षाला योग्य वाटेल अशा इतर ठिकाणी होईल :

परंतु, आयोगाची बैठक तीन महिन्यांतून किमान एकदा होईल.

(२) आयोग आपली स्वतःची कार्यपध्दती विनियमित करील.

(३) आयोगाचे सर्व आदेश व निर्णय सचिवाकडून किंवा सचिवाने त्याबाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या, आयोगाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

रिक्त पदे इत्यादींमुळे आयोगाची कार्यवाही विधिअग्राह्य न होणे.

९. आयोगामध्ये कोणतेही पद रिक्त आहे किंवा त्याच्या घटित होण्यात कोणताही दोष आहे याच केवळ कारणासाठी आयोगाच्या कोणत्याही कृतीबाबत किंवा कार्यवाहीबाबत हरकत घेण्यात येणार नाही किंवा कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही विधिअग्राह्य ठरविण्यात येणार नाही.

## प्रकरण तीन

## आयोगाची कार्ये

१०. (१) आयोगाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,— आयोगाची कार्ये.

(क) अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी भारताच्या संविधानामध्ये आणि राज्य विधानमंडळाने मंजूर केलेल्या कायद्यांमध्ये तरतूद करण्यात आलेल्या विविध संरक्षक उपाययोजनांच्या कार्यक्षमतेची तपासणी करणे ;

(ख) सर्व संरक्षक उपाययोजनांचे प्रभावी कार्यान्वयन व अंमलबजावणी होण्याची खात्री करून घेण्याच्या दृष्टीने शिफारशी करणे ;

(ग) संविधान आणि संसदेने आणि राज्य विधानमंडळाने अधिनियमित केलेले कायदे यात तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजना आणि अल्पसंख्याकांसाठी असलेली राज्य शासनाची धोरणे आणि योजना यांच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवणे ;

(घ) अल्पसंख्याकांच्या बाबतीत होणारा भेदभाव टाळण्याच्या प्रश्नाबाबत अभ्यास, संशोधन व विश्लेषण करणे ;

(ङ) शासन, शासकीय उपक्रम, निमशासकीय संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांच्या सेवेतील अल्पसंख्याकांच्या प्रतिनिधित्वाचे वास्तविक निर्धारण करणे आणि प्रतिनिधित्व अपुरे असल्यास त्याबाबतीत इच्छित पातळी गाठण्यासाठी उपाय सुचविणे ;

(च) राज्यात जातीय ऐक्याची सुनिश्चिती करण्यासाठी, ते राखण्यासाठी आणि त्याला उत्तेजन देण्यासाठी शिफारशी करणे ;

(छ) शासनाला विहित कालांतराने नियतकालिक अहवाल सादर करणे ;

(ज) अल्पसंख्याकांचे कल्याण आणि विकास यांच्या दृष्टीने, आयोगाच्या मते महत्त्वाची असेल, अशा इतर कोणत्याही बाबीचा अभ्यास करणे आणि समुचित शिफारशी करणे ;

(झ) अल्पसंख्याकांच्या गाऱ्हाण्यांचा विचार करणे आणि त्यावर वेळोवेळी यथोचित उपाय सुचविणे ;

(ञ) अल्पसंख्याकांना अधिकार व संरक्षक उपाययोजना यांपासून वंचित ठेवण्यासंबंधातील विनिर्दिष्ट तक्रारींमध्ये लक्ष घालणे आणि अशा बाबी समुचित प्राधिकरणाकडे नेणे ;

(ट) अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी असलेल्या पंतप्रधानांच्या १५ कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे समन्वयन व पर्यवेक्षण करणे ;

परंतु, पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही प्रकरण राष्ट्रीय १९९२ चा १९. अल्पसंख्याक आयोग अधिनियम, १९९२ याच्या कलम ३ अन्वये घटित केलेल्या राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाने हाती घेतले असेल तर, अशा प्रकरणामध्ये राज्य आयोगास असलेली अधिकारिता समाप्त होईल.

(२) शासन, आयोगाच्या शिफारशींच्या संबंधात केलेल्या किंवा करण्याचे योजलेल्या कारवाईसंबंधीचे ज्ञापन आणि अशा शिफारशींमधील कोणतीही शिफारस स्वीकारण्यात आली नसल्यास त्यासंबंधीची कारणे यांसह आयोगाच्या शिफारशी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण चार

### वित्तव्यवस्था, लेखे व लेखापरीक्षा

आयोगाचा अर्थसंकल्प आणि शासनाकडून मिळणारी अनुदाने.

**११.** (१) आयोग, प्रत्येक वर्षी, एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपासून प्रारंभ होणाऱ्या पुढील वित्तीय वर्षासाठी, त्याचे उत्पन्न आणि खर्च यांचे अर्थसंकल्पीय अंदाज, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा दिनांकापूर्वी तयार करील आणि ते शासनाकडे पाठवील.

(२) शासन, या बाबतीतील कायद्याद्वारे राज्य विधानमंडळाकडून यथोचित विनियोजन करण्यात आल्यानंतर, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता वापर करण्यासाठी, त्यास योग्य वाटतील अशा रकमा अनुदानाच्या स्वरूपात आयोगास देईल.

(३) या अधिनियमाखालील कार्ये पार पाडण्यासाठी, आयोगाला, त्यास योग्य वाटतील अशा रकमा अनुदानातून खर्च करता येतील आणि अशा रकमा, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अनुदानातून देय असलेला खर्च म्हणून समजण्यात येतील.

लेखे व लेखापरीक्षा.

**१२.** (१) आयोगाचे उत्पन्न व खर्च यांचे लेखे, विहित करण्यात येतील अशा नियमांनुसार ठेवण्यात येतील.

(२) आयोग, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील.

(३) आयोगाच्या लेख्यांची लेखापरीक्षा, शासन नियुक्त करील अशा लेखापरीक्षकाकडून आणि भारताचे नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांच्या कार्यालयाकडून दरवर्षी करण्यात येईल.

(४) लेखापरीक्षकाला, लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी, आयोगाचे सर्व लेखे आणि इतर अभिलेख पाहता येतील.

(५) आयोग, लेखापरीक्षेसाठी विहित करण्यात येईल असा खर्च अनुदानातून देईल.

(६) लेखापरीक्षकाकडून अहवाल मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, आयोग, लेख्यांच्या वार्षिक विवरणपत्राची एक प्रत, लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या प्रतीसह, शासनाकडे पाठवील आणि विहित करण्यात येईल अशा पध्दतीने लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र प्रसिध्द करण्याची व्यवस्था करील.

(७) शासन, लेखापरीक्षकांच्या अहवालाचे अवलोकन केल्यानंतर, त्यास योग्य वाटतील असे निदेश आयोगास देईल आणि आयोग अशा निदेशांचे पालन करील.

वार्षिक अहवाल.

**१३.** आयोग, मागील वित्तीय वर्षातील त्याच्या कार्याचा पूर्ण वृतांत देणारा, त्याचा वार्षिक अहवाल, प्रत्येक वित्तीय वर्षासाठी, विहित करण्यात येईल अशा नमुन्यांमध्ये व अशा वेळी तयार करील आणि त्याची एक प्रत शासनाकडे पाठविल.

वार्षिक अहवाल व लेखापरीक्षा अहवाल राज्य विधानमंडळासमोर ठेवणे.

**१४.** (१) शासन, वार्षिक अहवाल, त्यामधील राज्य शासनाशी संबंधित असतील अशा शिफारशींच्या संबंधात केलेल्या कारवाईसंबंधीचे ज्ञापन आणि अशा कोणत्या शिफारशी स्वीकारण्यात आल्या नसल्यास त्यासंबंधीची कारणे व लेखापरीक्षा अहवाल, ते अहवाल मिळाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

(२) आयोगास, राज्य विधानमंडळाच्या सभागृहांच्या निदेशानुसार, लोकहिताच्या असलेल्या अशा कोणत्याही बाबीवरील विशेष अहवाल वेळोवेळी शासनास सादर करता येतील.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

सद्‌भावनापूर्वक केलेल्या कृतींना संरक्षण.

**१५.** या अधिनियमानुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार, सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात आयोग किंवा आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा त्याचा कोणताही सदस्य किंवा आयोगाच्या निदेशांनुसार कृती करणारी कोणतीही व्यक्ती, यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य आणि कर्मचारीवर्ग लोकसेवक असणे.

१८६० चा ४५. **१६.** आयोगाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष, सदस्य तसेच या अधिनियमाखालील कर्तव्ये पार पाडण्यासाठी आयोगाकडून नियुक्त किंवा प्राधिकृत करण्यात आलेला प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

नियम करण्याचा अधिकार.

**१७.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी, शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन राहून, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनात मिळून, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि तो अशा प्रकारे ज्या अधिवेशनामध्ये ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करावा म्हणून किंवा तो नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, आणि तशा आशयाचा आपला निर्णय ते **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, अशा निर्णयाच्या **राजपत्रातील** प्रसिद्धीच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा, यथास्थिती, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**१८.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवली तर, शासनास, प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

सन २००४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २९ याचे निरसन व व्यावृत्ती.

**१९.** (१) महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अध्यादेश, २००४ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००४ चा महा. अध्या. २९.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाखाली करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) या अधिनियमाखाली करण्यात आलेली गोष्ट किंवा यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ७५ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, ऑगस्ट ८, २००५/श्रावण १७, शके १९२७

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra State Minorities Commission Act, 2004 (Mah. Act No. XXXI of 2005), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXXI of 2005

*(First published after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 8th August 2005.).*

An Act to constitute a State Commission for Minorities and to provide for matters connected therewith or incidental thereto.

WHEREAS the Maharashtra State Minorities Commission Bill, 2000 (L. A. Bill No. LXXVIII of 2000), introduced in the Maharashtra Legislative Assembly on the 30th November 2000 was referred to the Joint Committee of both Houses of the State Legislature on the 30th April 2002 and the same was pending with the Joint Committee ;

AND WHEREAS the representatives of the minority communities had been constantly requesting the State Government to expedite conferral of long pending statutory status on the Minority Commission ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session and the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to make a law to constitute a State Commission for minorities for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra State Minorities Commission Ordinance, 2004, on the 24th August 2004; Mah. Ord. XXIX of 2004.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature with certain modifications ; it is hereby enacted in the Fifty-fifth Year of the Republic of India as follows :—

## CHAPTER I

### PRELIMINARY

Short title, commencement and extent.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra State Minorities Commission Act, 2004.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 24th August 2004.

(*3*) It shall extend to the whole of the State of Maharashtra.

Definitions.

**2.** In this Act, unless the context otherwise requires,—

(*a*) " Commission " means the Maharashtra State Minorities Commission constituted under section 3 of the Act ;

(*b*) " Government " means the Government of Maharashtra ;

(*c*) " Member " means a Member of the Commission ;

(*d*) " Minorities " means the communities residing in the State of Maharashtra declared by the Government as minority communities, by order in the *Official Gazette*, from time to time ;

(*e*) " prescribed " means prescribed by rules made under this Act ;

(*f*) " Secretary " means the Secretary of the Commission.

## CHAPTER II

### STATE COMMISSION FOR MINORITIES

Constitution of Commission.

**3.** (*1*) As soon as may be after commencement of this Act, the Government shall constitute a body to be called as the Maharashtra State Minorities Commission to exercise the powers conferred on, and to perform the functions assigned to the Commission, under this Act with its headquarter at Mumbai.

(*2*) The Commission shall consist of,—

(*a*) a Chairperson, Vice-Chairperson and nine other Members to be nominated by the Government from amongst persons of eminence, ability and integrity :

Provided that, all the Members including the Chairperson and the Vice-Chairperson shall be from amongst the Minorities ; and

(*b*) the Secretary appointed by the Government shall be an officer not below the rank of Deputy Secretary to Government.

Term of office and conditions of service of Chairperson, Vice-Chairperson and Members.

**4.** (*1*) Subject to the pleasure of the Government, the Chairperson, Vice-Chairperson and every Member of the Commission, shall hold office for a term of five years from the date he assumes office.

(*2*) The Chairperson, Vice-Chairperson or a Member may, resign from his office in writing under his signature addressed to the Government, but shall continue in office until his resignation is accepted.

(*3*) The Chairperson, Vice-Chairperson and other Members shall receive such salary and allowances, as may be prescribed.

(*4*) The salary and allowances payable to the Chairperson, Vice-Chairperson and other Members shall be defrayed out of the grants referred to in sub-section (*2*) of section 11.

(*5*) A casual vacancy in the office of a Member shall be filled up as soon as may be, by the Government and a Member so nominated shall hold office so long as the Member in whose place he is nominated would have held office.

(*6*) In the absence of the Chairperson, the Vice-Chairperson shall perform the functions of the Chairperson under the Act and rules made thereunder.

Disqualification.

**5.** (*1*) A person shall be disqualified for being appointed as and for being continued as the Chairperson, the Vice-Chairperson or a Member, as the case may be, if he—

(*a*) is convicted and sentenced to imprisonment for an offence which, in the opinion of the Government, involves moral turpitude ; or

(*b*) is of unsound mind and stands so declared by a competent court ; or

(*c*) is an undischarged insolvent ; or

(*d*) has been removed or dismissed from service of the Central Government or a State Government or a Body or Corporation owned or controlled by the Central Government or a State Government ; or

(*e*) refuses to act or becomes incapable of acting ; or

(*f*) is without obtaining leave of absence from the Commission, absents from three consecutive meetings of the Commission ; or

(*g*) has, in the opinion of the Government, so abused the position of the Chairperson, Vice-Chairperson or Member as to render that person's continuance in office as detrimental to the interests of the minorities or the public interest:

Provided that, no person shall be removed under this clause until that person has been given a reasonable opportunity of being heard in the matter.

(*2*) Any person who is disqualified under sub-section (*1*) shall be removed by the Government.

Secretary of Commission.

**6.** (*1*) The Secretary shall receive such salary and other allowances as the Government may determine from time to time.

(*2*) The Government may grant from time to time, leave of absence to the Secretary.

(*3*) The Secretary shall be the Chief Executive of the Commission and shall,—

(*a*) operate the grants of the Commission;

(*b*) cause to be maintained accounts of the Commission; and

(*c*) discharge such other functions, which are conferred on him by or under this Act or any other law for the time being in force.

Staff of Commission.

**7.** (*1*) The Government shall provide such staff to the Commission, as may be required for the proper functioning of the Commission.

(*2*) The administrative expenses of the Commission including the salaries, allowances and pensions payable to the Secretary and other officers and staff of the Commission shall be paid out of the grants referred to in sub-section (*2*) of section 11.

Meetings of Commission.

**8.** (*1*) The Commission shall meet as and when necessary at Mumbai or at other places, as the Chairperson may think fit:

Provided that the Commission shall meet at least once in three months.

(*2*) The Commission shall regulate its own procedure.

(*3*) All the orders and decisions of the Commission shall be authenticated by the Secretary or any other officer of the Commission duly authorised by the Secretary in this behalf.

Vacancies etc. not to invalidate proceedings of Commission.

**9.** No act or proceeding of the Commission shall be questioned or shall be invalid merely on the ground of the existence of any vacancy or defect in the constitution of the Commission.

## CHAPTER III

### FUNCTIONS OF THE COMMISSION

Functions of Commission.

**10.** (*1*) The functions of the Commission shall be as follows :—

(*a*) to examine the working of various safeguards provided in the Constitution of India and in the laws passed by the State Legislature for the protection of minorities ;

(*b*) to make recommendations with a view to ensuring effective implementation and enforcement of all the safeguards ;

(*c*) to monitor the working of the safeguards provided in the Constitution, laws enacted by the Parliament and the State Legislature, and policies and schemes of the State Government for minorities ;

(*d*) to conduct studies, research and analysis on the questions of avoidance of discriminations against minorities ;

(*e*) to make a factual assessment of the representation of minorities in the services of the Government, Government undertakings, Quasi-Government bodies, Municipal Corporations, Municipal Councils, *Zilla Parishads, Panchayat Samitis* and Village *Panchayats* and in case, the representation is inadequate, to suggest ways and means to achieve the desired level ;

(*f*) to make recommendations for ensuring, maintaining and promoting communal harmony in the State ;

(*g*) to make periodical reports at prescribed intervals to the Government ;

(*h*) to study any other matter which, in the opinion of the Commission, is important from the point of view of the welfare and development of minorities, and to make appropriate recommendations ;

(*i*) to consider the grievances of the minorities and to suggest appropriate solution, from time to time ;

(*j*) to look into specific complaints regarding deprivation of rights and safeguards of minorities and take up such matters with the appropriate authorities ;

(*k*) to co-ordinate and supervise the implementation of the Prime Minister's 15 Points Programme for Welfare of Minorities :

Provided that, if any matter specified in sub-section (*1*) is undertaken by the National Commission for Minorities constituted under section 3 of the National Commission for Minorities Act, 1992, the State Commission shall cease to have jurisdiction in such matters.

19 of 1992.

(2) The Government shall cause the recommendations of the Commission to be laid before each House of the State Legislature along with the memorandum explaining the action taken or proposed to be taken on the recommendations and the reasons for non-acceptance, if any, of such recommendations.

## CHAPTER IV

### FINANCE, ACCOUNTS AND AUDIT

Budget of Commission and grants by Government.

**11.** (*1*) The Commission shall prepare every year before such date and in such form, as may be prescribed, a budget estimate of its income and expenditure for the financial year to commence on the first day of April next following and shall forward it to the Government.

(*2*) The Government shall, after due appropriation made by the State Legislature, by law in this behalf, pay to the Commission by way of grants such sums of money as the Government may think fit for being utilised for the purposes of this Act.

(*3*) The Commission may spend such sums out of the grant as it thinks fit for performing the functions under this Act, and such sums shall be treated as expenditure payable out of the grants referred to in sub-section (*2*).

Accounts and audit.

**12.** (*1*) Accounts of the income and expenditure of the Commission shall be kept in accordance with such rules, as may be prescribed.

(*2*) The Commission shall prepare an annual statement of accounts in such form as may be prescribed.

(*3*) The accounts of the Commission shall be audited annually by such auditor as the Government may appoint and by the office of the Comptroller and Auditor General of India.

(*4*) The auditor shall for the purpose of the audit, have access to all the accounts and other records of the Commission.

(*5*) The Commission shall pay out of the grant such charges for the audit as may be prescribed.

(*6*) As soon as may be after the receipt of the report of the auditor, the Commission shall send a copy of the annual statement of accounts, together with a copy of the report of the auditor to the Government and shall cause to be published the annual statement of accounts in such manner as may be prescribed.

(*7*) The Government may, after perusal of the report of the auditor, give such directions, as it thinks fit, to the Commission and the Commission shall comply with such directions.

Annual report.

**13.** The Commission shall prepare, in such form and at such time, for each financial year, as may be prescribed, its annual report, giving a full account of its activities during the previous financial year and forward a copy thereof to the Government.

Annual report and audit report to be laid before State Legislature.

**14.** (*1*) The Government shall cause the annual report together with a memorandum of action taken on the recommendations contained therein, in so far as they relate to the Government, and the reasons for the non acceptance, if any, of such recommendations and the audit report to be laid, as soon as may be, after the reports are received, before each House of the State Legislature.

(*2*) The Commission may, at the direction of the Houses of the State Legislature, submit from time to time, special reports on any matter of public importance to the Government.

## CHAPTER V

### MISCELLANEOUS

**15.** No suit, prosecution or other legal proceedings shall lie against the Commission or the Chairperson, Vice-Chairperson or any Member thereof or any person acting under the direction of the Commission, in respect of anything done in good faith or purported to have been done in pursuance of this Act or the rules made thereunder. Protection of action taken in good faith.

**16.** The Chairperson, Vice-Chairperson, Members of the Commission and every officer and employee appointed or authorised by the Commission to exercise the functions under this Act shall be deemed to be public servant within the meaning of section 21 of the Indian Penal Code. Chairperson, Vice-Chairperson, Members and staff of Commission to be public servant.

45 of 1860.

**17.** (*1*) The Government may, by notification in the *Official Gazette*, and subject to the condition of previous publication, make rules for the purposes of giving effect to the provisions of this Act. Power to make rules.

(*2*) Every rule made under this Act shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature, while it is in session for a total period of thirty days, which may be comprised in one session or in two or more successive sessions, and if before the expiry of the session in which it is so laid or the session immediately following, both Houses agree in making any modification in rule or both Houses agree that rule should not be made, and notify their decision to that effect in the *Official Gazette*, the rule shall, from the date of publication of such decision in the *Official Gazette*, have effect only in such modified form or be of no effect, as the case may be; so, however, that any such modification or annulment shall be without prejudice to the validity of anything previously done or omitted to be done under that rule.

**18.** (*1*) If any difficulty arises in giving effect to the provisions of this Act, the Government may, as occasion arises, by an order published in the *Official Gazette*, do anything, not inconsistent with the provisions of this Act, which appears to it to be necessary or expedient for removing the difficulty: Power to remove difficulties.

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

(*2*) Every order made under this section shall be laid, as soon as may be after it is made, before each House of State Legislature.

**19.** (*1*) The Maharashtra State Minorities Commission Ordinance, 2004 is hereby repealed. Repeal of Mah. Ord. XXIX of 2004 and saving.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under this Act.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई